International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 November – December 2022

# चित्रपट जनमाध्यमातील मुस्लिम स्त्री : 'निकाह' चित्रपटाचा अभ्यास

**अर्चना माने[1], डॉ. ओमप्रकाश कलमे[2]**

*[1]संशोधक विद्यार्थी, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*

*[2]प्रपाठक, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*

*Corresponding Author - अर्चना माने*

**DOI - 10.5281/zenodo.8141730**

मानवी समाजाची उत्पत्ती व विकासाप्रमाणेच संज्ञापन प्रक्रियेतून जगातील मानवी 'संस्कृती' अस्तित्त्वात आलेल्या असल्याचे दिसते. संज्ञापनाव्दारेच त्या त्या संस्कृतीची मूल्ये जोपासना होऊन ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होतात. असे घडत असताना काल व स्थलसापेक्ष असे बदल घडून येवून समाजातील अनेक नियम, चालिरिती, परंपरा व रूढींचेही संक्रमण होत असते. काहीवेळा धर्माच्या व संस्कृतीच्या नावाखाली अनेक कर्मठ सूत्रेही स्विकारली जातात. किंबहुना त्यालाच विशिष्ट धर्माच्या संस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षणही मानले जाते. परिणामी अशा अनेक योग्य- अयोग्य- चालीरिती व परंपरा रूढ झाल्याचे दिसते. हिंदु, मुस्लिम, ख्रिस्ती किंवा अन्य समाजांमध्ये यांचे दर्शन हमखास घडते. असे असले तरीही वर उल्लेख केल्याप्रमाणे मानवी समाज संस्कृती ही संज्ञापन प्रक्रियेतून अस्तित्त्वात येत असल्यामुळे सद्सदविवेक बुद्धीच्या विधायक दृष्टिकोनातून ही संज्ञापन प्रक्रिया घडणे अपेक्षित असते. समाजातील प्रत्येक संज्ञापन साधनाची ती एक नैतिक जबाबदारी म्हणून स्विकारणे जणू बंधनकारक ठरते. ज्या समाजात संज्ञापनाची साधने प्रबळ व सक्षम असतात अशाच समाजाचा सामाजिक व सांस्कृतिक विकास झपाट्याने झाल्याचे त्या त्या काळात सिद्ध झालेले आहे. येथे चित्रपट हे एक जनमाध्यम असून तेही यासाठी अपवाद नाही.

या पार्श्वभूमीवर आपण समाजातील मुस्लिम स्त्रियांच्या जीवनाचा विचार करतो तेव्हा हे लक्षात येते की धर्माच्या आणि संस्कृतीच्या जाचक बंधनांनी इतर स्त्रियांप्रमाणेच या स्त्रियांच्याही जगण्याच्या सीमारेषा बंदिस्त व मर्यादित केल्या गेल्या आहेत. मुस्लिम स्त्री म्हटली की एक तर ती बुरख्यात 'रूपवती' दाखविली जाते किंवा बुरख्या बाहेर मुजरा करतांना दिसते. परंतु एक जीवंत 'माणूस' म्हणून तिची खरी ओळख क्वचितच आपणास कला, साहित्य, चित्रपटातून पाहावयास मिळते.

दिग्दर्शक बी. आर. चोपडा यांचा 'निकाह' हा चित्रपट या परिस्थितीला अपवाद असून या चित्रपटाच्या अनुषंगाने पहिल्यांदाच भारतीय समाजापुढे मुस्लिम स्त्रीच्या व्यथेची, तिच्या घुसमटीची, तिच्यावर होणाऱ्या अन्यायाची बाजू मांडण्यात आली आहे. मुस्लिम धर्मातील 'तलाक' कायद्याविरूद्ध पहिल्यांदाच उघडपणे भाष्य करून त्याचे दोष अधोरेखित करणारा व पुरुष प्रधान संस्कृतीवर बोट ठेवणारा हा चित्रपट आहे. निकाहच्या निमित्ताने एरवी मुस्लिम स्त्रीच्या सौंदर्यस्तुतीत रमणारा भारतीय चित्रपटाचा पडदा प्रथमच मुस्लिम स्त्रिच्या अस्तित्वाची खऱ्या अर्थाने दखल घेताना दिसतो. त्यामुळे प्रवाहाच्या विरूद्ध जावून खरी वस्तुस्थिती दाखवू पाहणारा दिग्दर्शक बी. आर. चोपडा यांचा 'निकाह' चित्रपट कौतुकास्पद आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात चित्रपट जनप्रसार माध्यमांची जबाबदारी आणि बी. आर. चोपडा यांच्या ‘निकाह’ या चित्रपटाची मुस्लिम स्त्रीच्या दृष्टीने करण्यात आलेली मांडणी यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

चित्रपट जनप्रसार माध्यमाच्या संज्ञापन कार्याचे स्वरूप पाहता येणारा अनुभव किंचितसा नवीन वाटतो. माहिती, शिक्षण, मार्गदर्शन व विश्लेषण ही कोणत्याही जन माध्यमाची मूलभूत कार्यतत्वे मानली जातात. चित्रपट माध्यमही याला अपवाद नाही. अर्थात यातील मनोरंजन हा घटक सर्वाधिक व्यापक असला तरी या घटकांतर्गत माहिती, प्रबोधन, आणि जाणिवा जागृती सारख्या कार्य घटकांचा अविष्कार चित्रपट माध्यमातून होत असतो.

चित्रपट हे एक असे प्रसार माध्यम आहे की ज्यात कलेच्या अभिव्यक्तीचा अंतर्भाव असतो. परंतु त्याच्याजोडीला येथे व्यावसायिकतेलही तेवढेच महत्त्व दिले जाते. थोडक्यात मनोरंजनाच्या पातळीवर कलेचा व्यवसाय करून जनसंज्ञापनाचे कार्य करणारे व बोधनाचा हेतू बाळगणारे

चित्रपट हे करमणुकीप्रधान प्रसार माध्यम आहे. साहाजिकच या प्रसार माध्यमाच्या स्वरूपाची एकूण बांधणी आणि त्यावर आधारित जनसंज्ञापनाची एकूण मांडणी ही इतर प्रसार माध्यमांपेक्षा कितीतरी भिन्न आहे. उदयापासूनच या माध्यमाच्या आकर्षणाचे गारूड जनमानावर प्रस्थापित झालेले आहे. त्यामुळे या माध्यमाची व्याप्ती,

वाटतो. समाज मनावर परिवर्तनाच्या हेतूने स्थिरावलेली दिसते. साहजिकच इतर कोणत्याही जनप्रसार माध्यमापेक्षा चित्रपट माणसाला अंतर्बाह्यरीत्या समरस होण्यास भाग पाडून जनसंज्ञापनाची जबाबदारी पूर्ण करताना दिसतो. त्यामुळेच या प्रसारमाध्यमाचा प्रभाव टाकण्याची आणि लोकांच्या मनापर्यंत पोहचण्याची क्षमता अधिक असल्याचे स्पष्ट होते.

जनसंज्ञापनाच्या दृष्टिने या माध्यमाचा विचार केला असता एक गोष्ट लक्षात येते की, हे प्रसार माध्यम आपल्या उदयापासूनच लोकांचे अर्थात त्या त्या अनुषंगिक समाजाचे निव्वळ रंजन (Entertain) न करता प्रबोधनात्मक (Convice) विश्वास निर्माण करून समाजात सुधारणा घडविण्याचे (Convert) कार्य करीत आलेले आहे. त्याचबरोबर वैयक्तिक आणि सामाजिक स्वरूपात महत्त्वपूर्ण वैचारिक आणि

विचारधारात्मक हस्तक्षेपही करीत आलेले आहे. भारतासारख्या बहुतांशी निरीक्षर, अज्ञानी व अंधश्रद्ध समाजात जनजागृती करण्याचे कार्य हे माध्यम अत्यंत प्रभावीपणे करीत आलेले आहे. निरिक्षरांना, अडाणी लोकांना एखादी गोष्ट तोंडी पटवून सांगणे अवघड असते. तीच बाब रूढी परंपरा जोपासणाऱ्यांची असते. अशावेळी लोकांमध्ये जागृती करावयाची असेल तर कितीही सभा, बैठका घेतल्या किंवा भाषणे केली तरी फारसा उपयोग होत नाही. परंतु तोच विषय जेव्हा चित्रपटांच्या माध्यमातून एखाद्या कौटुंबिक कथानकाव्दारे मांडला तर त्याचा होणारा समाजावरील परिणाम सर्वदूर व प्रभावीपणे झाल्याचा दिसतो. चित्रपट हे दृश्यश्राव्य माध्यम आहे. अर्थात समाजातील हे बदल किंवा प्रबोधन तात्काल दिसून येतीलच असे नाही आणि ते दिसून आले तरी त्याचे परिणाम काळाच्या कसोटीवर भविष्यात अधिक स्पष्ट दिसून येतात. उदा. एकोणीशे साठ-सत्तरच्या दशकापर्यंत भारतीय समाजात आजच्यासारखी आंतरजातीय किंवा प्रेमविवाहास मान्यतानव्हती. मात्र हा विषय तत्कालीन चित्रपटांतून मांडला जात होता. आजची परिस्थिती वेगळी आहे. अर्थात आंतरराष्ट्रीय किंवा प्रेमविवाहास आज समाजात जी मान्यता मिळाली आहे ते केवळ चित्रपटांमुळे असे अजिबात नाही. साठ-सत्तरच्या दशकात निर्माण झालेल्या चित्रपटांनी त्या दृष्टिने विचार व कृती करण्याची समाजाला चालना नक्कीच दिली आहे.

या उलट चित्रपटांतून दाखविली जाणारी हाणामारी, व्यसनाधीनता, मुलींची छेडाछेड मुळे समाजात या अनिष्ट गोष्टी वाढीस लागल्याचाही अनुभव नाकारता येत नाही. चित्रपटाद्वारे घडून येणारे जनसंज्ञापनाचे कार्य अशा दोन्ही पातळ्यांवरून घडून येणारे कार्य ठरते. “चित्रपट माध्यमाद्वारे दिला जाणारा संदेश समाजमन चटकन स्विकारणारे असते त्यामुळे चित्रपटाद्वारे संज्ञापन कोणत्या पातळीवर करावे हे चित्रपटकर्मींच्या हाती असल्यामुळे चित्रपट या जनमाध्यमाच्या हाताळणीचे महत्त्व अधोरेखित होते. त्यादृष्टीने पाहिल्यास चित्रपटाने समाज बदलू शकेल असे वाटत नाही. ज्या प्रकारचा बदल घडून येत राहिलेला असतो, त्यात तुम्ही, हातभार लावू शकता एवढच.” असे उद्गार भारतीय प्रतिभावंत दिग्दर्शक सत्यजित राय यांनी काढले आहेत ते यथार्थच म्हणावे लागतील.

मुस्लिम धर्मातील तलाक कायदा आणि स्त्री समस्येचा दिग्दर्शक बी. आर. चोपडा यांच्या ‘निकाह’ चित्रपटाच्या अनुषंगाने परामर्श घेणे आवश्यक वाटते. हिंदी आणि त्यातही पोषाखी चित्रपटांतून साकार झालेली मुस्लिम स्त्रीची व्यक्तीरेखा बहुदा ही प्रामुख्याने नवाबी ऐश्वर्य, राहणीमानातले शानशौक, रसिकता, आदब, मेहमाननवासी, जिगर या साऱ्या खास मुस्लिम संस्कृतीतल्या वैशिष्ट्यपूर्ण छटांच्या पार्श्वभूमीवर दृग्गोचर होतांना दिसतात. सोबतीला गझल, कव्वाल्या, मुशायरे, पर्दा, निकाह, तेहजिब, मुजरा, सुफी संगीत यांसारखा खास मुस्लिम थाट असतो तो वेगळाच! स्वाभाविकच भारतीय चित्रपट इतिहासात जेंव्हा जेंव्हा पडद्यावर मुस्लिम संस्कृती प्रकट झाली तेंव्हा तेंव्हा मोठ्या पडद्यावर मुस्लीम स्त्रीची भूमिका मोहक, उठावदार भासली आहे. या उलट फार क्वचितच मुस्लिम स्त्रीच्या जीवनातील व्यथा आपणास पडद्यावर पाहावयास मिळते. त्यापैकी धर्माच्या पगड्याखाली बंदिस्त जीवन जगणाऱ्या मुस्लिम स्त्रीच्या अंतकरणातील व्यथा सांगणारा चित्रपट म्हणजे दिग्दर्शक बी. आर. चोपडा यांचा ‘निकाह’ हा चित्रपट होय. मुस्लीम धर्मातील तलाकनामा कायद्याच्या पक्षपातीपणावर बोट ठेवून पुरूषी संस्कृतीत बळी पडलेल्या स्त्रीच्या आयुष्याची व्यथा सांगणारा हा एक ज्वलंत असा चित्रपट म्हणावा लागेल.

नया दौर, गुमराह व धनराज चौधरी सारखे एकापेक्षा एक सुंदर सामाजिक चित्रपटांची निर्मिती व दिग्दर्शन करणारे बलदेव राज चौपडा उर्फ बी. आर. चोपडा यांना चित्रपट जनमाध्यमाच्या संज्ञापन क्षमतेचा खरा अर्थ समजला होता असे म्हणावे लागेल. त्यांनी निव्वळ पैसा कमविण्याचा उद्देश नजरेसमोर न ठेवता सामाजिक प्रबोधनाच्या भानही ठेवले होते हे यातून स्पष्ट होते. ‘निकाह’ हा त्यापिकीच एक असा सामाजिक समस्येवर भाष्य करणारा चित्रपट आहे असे म्हणता येईल.

मुळात मुस्लिम समाज हा भारतीय समाजाचा एक भाग असूनही हा समाज कुठे तरी आत्यंतिक खाजगीपण जपणारा असाच राहिला आहे. ही वस्तुस्थिती आज ही फारशी बदललेली नाही. यानिमित्ताने सर्वसाधारण स्थिती पाहता या समाजातील बहु, बेटी अजूनही कायम पडद्याच्या आत, बुरख्यात आहेत. धर्माच्या आणि कर्मकांडाच्या गराड्यात अडकलेल्या आहेत! शिक्षण, स्वातंत्र्य, अर्थाजन यांसारख्या संकल्पना असे म्हणावे लागेल कोसो मैल दूर आहेत असे म्हणावे लागेल. अर्थात भारतीय समाजातील सर्वच धर्मातील स्त्रीयांची थोड्याफार फरकाने अशी कुचंबना होताना दिसते. तुलनेने मुस्लीम समाजातील स्त्रियांची होणारी कुचंबना आणि त्यांच्यावर लादण्यात आलेली बंधने अधिक जातक वाटतात.आजही मुस्लिम समाजातील बहुतेक स्त्रिया या सर्वार्थाने कुटूंबातील पुरूषांवर अवलंबून असतात. तिची स्वतःची खास अशी वेगळी म्हणून ओळख ना कुटूंबातील इतर कोणाला आहे ना खुद्द तिला! अशा परिस्थितीत एखादी गोष्ट चुकीची आहे हे मूळात तिच्या स्वतःच्या विचारांनी तिला समजणे कठीण आहे आणि

जरी समजले तरी अशा गोष्टीला विरोध करणे हे तिच्यासाठी पराकोटीतीलच गोष्ट म्हणावी लागेल. शिवाय ती गोष्ट जर धर्माशी, कर्मकांडाशी निगडीत दरतो. असेल तर हा विरोध तिच्यासाठी निव्वळ अशक्यच ठरतो. स्त्रीच्या नेमक्या याच आगतिकतेचे चित्रण 'निकाह' चित्रपटात करण्यात आले आहे.

आई, बहीण, मुलगी, पत्नी आणि अशा कितीतरी नात्यात विभागली गेलेली भारतीय स्त्री आपल्या कर्तव्यात कुठेही कमी पडत नाही आणि असे असतांना पुरुषसत्ताक समाजात तिला स्वत:ची अशी कोणतीच ओळख नाही हे दाहक वास्तव आहे. उलट धर्माच्या नावाखाली तिच्यावर जेवढी म्हणून बंधने लादता येतील त्यापेक्षा कितीतरी अधिक बंधने या पुरुषी संस्कृतीने लादलेली आहेत. मुस्लिम समाजातील पर्दा, बुरखा, गोषा पद्धती याचेच द्योतक म्हणावे लागेल. स्त्रीच्या भावभावनांचा, तिच्या त्यागाचा, तिच्या प्रेमाचा कसलाही विचार गृहित न धरता पूर्णतः पुरूषाला वाटले तर तिच्यापासून घटस्फोट घेता यावा म्हणून मुस्लिम धर्मात अस्तित्वात असलेला 'तलाकनामा' हा सुद्धा अशाच धर्माच्या नावाखाली अंमलात आणलेला पुरूषी कायदा होय! एक माणूस म्हणून स्त्रीकडे न पाहता, तिची कोणतीच मते, इच्छा विचारात न घेता तलाक-तलाक-तलाक अशा एका शब्दाच्या पतीच्या सलग तीन वेळा उच्चाराने मुस्लिम स्त्रिच्या आयुष्याची होळी करणारा हा कायदा! पतीने पत्नीसमोर तीन वेळा तलाक म्हटले की झाला घटस्फोट! मग भलेही तो पती कर्तव्यशून्य असेल किंवा निकम्मा किंवा व्यसनी का असेना. स्त्रीवर हुकूमत गाजविण्यासाठी धर्माने खास पुरूषांसाठी तयार केलेली ही तरतुद आहे. स्त्रीला सर्वार्थाने लाचार, दुबळी, आगतिक बनविणारी, तिला नेहमी धाकात आणि नेहमी जीवनात अधांतरी ठेवणारी 'पुरूषी संस्कृतीची' केवढी तरी सहज सोपी परंतु स्त्रीसाठी तेवढीच कठीण, अंधारी पद्धत म्हणजे हा तलाकनामा होय! बी. आर. चोपडा यांनी आपल्या 'निकाह' चित्रपटात याच तलाकनामाची दाहकता चित्रित केलेली ही कलाकृती म्हणजे वास्तववादी चित्रपटाचा एक उत्तमनमुना म्हणावा लागेल.

मुस्लिम समाजातील नेमक्या याच दाहकतेला अधोरिखित करीत, दिग्दर्शक बी.आर. चोपडा यांनी 'निकाह'मधून स्त्रीला कठपुतली ठरविणाऱ्या निकाह नाम्याविरूद्ध आवाज उठविलेला आहे. चित्रपटाची नायिका निलोफर ही आपल्या पहिल्या पतीच्या उर्मट आणि नवाबी मिजासखोर स्वभावाचा बळी ठरते. शिवाय तो व्यसनी आणि मारझोड करणारा असतो ते वेगळेच! आणि तरीसुद्धा निलोफरला पती म्हणून त्याला आपल्या आयुष्यात योग्य तो मान द्यावाच लागतो. या उलट पती वसिम अहमद मात्र तिच्याकडे आपली हक्काची शय्यासोबत करणारी एक सुंदर परंतु निर्जिव वस्तू म्हणून पाहत असतो. त्याच्याकडून होणाऱ्या अन्याय अत्याचारांची हद्द ओलांडली जाते. परंतु निव्वळ ती एक स्त्री असल्यामुळे या सर्वांविरूद्ध कुठेही वाच्यता करू शकत नाही. शिवाय सुशिक्षित असूनही मुस्लिम कायदेकानुनानुसार तिला पूर्णतः पतीवरच अवलंबून रहावे लागत असते. खरेतर निलोफरने आपल्या पतीला घटस्फोट द्यावा अशी परिस्थिती असतानाही तिला ते शक्य नसते. कारण ती एक मुस्लिम स्त्री आहे! आणि मुस्लिम स्त्रीने घटस्फोट अर्थात तलाक मागणे म्हणजे महापाप !

आणि मग एका वळणावर जणू काही निलोफरच दोषी असल्याप्रमाणे पती वासिम अहमद दारूच्या नशेत निलोफरला तलाक देवून मोकळा होतो. या घटनेने निलोफरचे आयुष्य उद्धवस्त होऊन जाते. त्या तीनवेळा उच्चारलेल्या 'तलाक' शब्दाने एका क्षणात तिला निराधार लाचार अवस्थेत रस्त्यावर येण्याची वेळ येते, तसे पाहता तलाक मिळण्या-अगोदर तरी निलोफर कुठे सुखी असते? परंतु आता मात्र समाजात वावरतांना नवऱ्याने टाकलेली बाई या शिक्क्यासह वावरणे तिला भाग पडते. कालांतराने वसिमला आपली चूक कळून येते, परंतु तेव्हा बराच उशिर झालेला असतो. वेळ

आणि निलोफर दोन्ही ही गोष्टी त्याच्यापासून खूप दूर गेलेल्या असतात. निलोफरचा काहीही गुन्हा नसतांना निव्वळ दारूच्या नशेत तिच्या पतीने तीन वेळा उच्चारलेल्या 'तलाक' शब्दामुळे निलोफरच्या आयुष्याची दुर्दशा होऊन जाते आणि ही चूक सुधारायला वसिम जातो तेंव्हा पुन्हा एकदा धर्माचा कायदा आडवा येतो, मुस्लिम धर्मानुसार एकदा तलाक दिल्यावर तलाकशुदा पत्नीचा दुसरा विवाह होऊन तो पती आपल्या पत्नीला स्वतःच्या मर्जीने जो पर्यंत तिला तलाक देत नाही तोपर्यंत त्या स्त्रीली पहिल्या पतीशी पुन्हा विवाह करता येत नाही असा हा मुस्लिम धर्माचा कायदा आहे.

दरम्यान निलोफरचे तिच्या कॉलेजमधील जुन्या मित्राशी म्हणजे हैदरशी निकाह होतो असे दाखविले आहे. आपल्या दुसऱ्या निकहाने जरा कुठे निलोफरचे आयुष्य स्थिरस्थावर होऊ पाहत असते. आणि ऐवढ्यात गैरसमजेतून पहिल्या पतीशी निलोफरचा पुन्हा निकाह व्हावा म्हणून हैदर तिला तलाक देण्याचा निर्णय घेतो. निलोफर पुन्हा एकदा अस्थिर जीवनाच्या उंबरठ्यावर येऊन उभी राहते. यावेळीही निलोफरच्या इच्छेचा, तिच्या भावभावनांचा, मर्जी, आशा-आकांक्षांचा कोणताच विचार केला जात नाही. किंबहुना निलोफर एक जीवंत 'माणूस' आहे ही गोष्ट इथे गृहित धरली जात नाही. निलोफर तलाक देण्याचा तिचा निकाह लावण्याचा एकूण तिच्या आयुष्याचा निर्णय घेण्याचा अधिकार धर्माने या दोन पुरुषांना बहाल केलेला आहे. या उलट पुरूषांना कोणतीच बंधने नाहीत. त्यांनी कितीही बायका केल्या तर त्याला काहीच हरकत नाही. उलट तो पुरूषार्थ समजला जातो. बरे या बायका करायलाही कोणती बंधने नाहीत. बंधने आहेत ती फक्त स्त्रीला ! मुस्लिम समाजातील स्त्रीच्या या अगतिकतेला दिग्दर्शक बी. आर. चोपडांनी निलोफरच्या स्वरूपात पडद्यावर वाचा फोडलेली आहे. निलोफर म्हणजे जणू टेनिसचा एक बॉल. एकाने आपल्याला हवा तसा फटकारला की समोरचा लगेच तो पुन्हा आपल्याला हवा तसा फटकारण्यासाठी तयार असतो. हा खेळ कितीवेळ चालेल.. कधी संपली याचा नियम नाही. शिवाय जुना झाला म्हणून परत बॉल बदलण्याची सोय असतेच. असे दाखले उपरोधाने देता येवू शकतात. या चित्रपटाच्या माध्यमातून समाज बदलण्याची व सुधारण्याची अपेक्षा असली तरी रुढींचा घट्टपणा हा बदल अशक्य ठ्वितो हे वास्तव पुढे आलेले दाखवले गेले आहे.

एकूण मुस्लिम समाजातील तलाकनाम्यामुळे स्त्रीच्या होणाऱ्या शोकांतिकेची प्रथमच 'निकाह' मुळे पडद्यावर आली. निव्वळ आणली गेली नाही तर दिग्दर्शक बी.आर. चोपडांनी ती अत्यंत ज्वलंत व प्रभावीपणे मांडली आहे. मुस्लिम संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर घडणारी 'निकाह'ची कथा स्त्रीच्या वेदनेचे नेमके चित्रण करतांना दिसते. केवळ चित्रण करतेच असे नव्हे तर प्रेक्षकांना अंर्तमुख होऊन विचार करण्यास भाग पाडते.

**शोध :**

१. दृश्यश्राव्य गुणवैशिष्ट्यामुळे चित्रपट जनमाध्यम हे अत्यंत प्रभावी जनसंज्ञापनाचे साधन असल्यामुळे या माध्यमाचा जनसंज्ञापनाच्या दृष्टीने जबाबदारी युक्त वापर करावा.
२. 'निकाह' चित्रपटातून मुस्लीम समाजातील निकाहनाम्यामुळे निर्माण होणाऱ्या स्त्रीयांच्या समस्यांचे ज्वलंत चित्रण करण्यात आलेले असून हा विषय हाताळून चित्रपट माध्यमाच्या प्रबोधनात्मक जनसंज्ञापनाचेही स्वरूप स्पष्ट केले आहे.

**निष्कर्ष :**

मनोरंजनाद्वारे होणारे प्रबोधन व्यक्तीच्या मनाशी थेट होणारे संज्ञापन असते. त्यामुळे चित्रपटातून

मांडल्या गेलेल्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना या अनुषंगाने व्यक्तीला अंतर्मूख होऊन विचार करण्यास उद्युक्त करतात. हे महत्वाचे आहे.

**संदर्भ सूची :**


१. मुस्लिम सिनमे समाजः बुरख्यातला, बुरख्या बाहेरचा, इसाक मुजावर, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई सन २०११.

२. मुख्य प्रवाहातील भारतीय चित्रपट, पाश्चात्य प्रभाव आणि सांस्कृतिक अस्मिता धमकी की प्रेरणा ?

३. सिनेमाची भाषा, डॉ. मनिषा कावतकर, उन्मेत प्रकाशन, जुलै २०१२.

४. डिफ्लोर एम एल आणि बालरॉफिच सँड्राः थियरिज ऑफ मास कम्युनिकेशन


**इंटरनेट :**


१. तीन शब्दों से छलनी होता पाक निकाह, शैलेंद्र उमर लाल, नया इंडिया.कॉम, १९ वी फेब्रुवारी, २०१२.

२. सिनेमा आणि संस्कृती भाग २, हम सब एक है अर्थात मुस्लिम सोशल शर्मिला फडके, Maapboli.com, १८ जुन २०११.

३. बी. आर. चोपडाः सामाजिक सरोकार के फिल्मकार समय ताम्रकर, webduniyahidi.com